नि-९

# कंत्राटी पदभरती जाहिरात
# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# आरोग्य विभाग पुणे महानगरपालिका

आय.एच.एफ.डब्ल्यू/पी.एम.सी/ दिनांक १६/०९/२०२५

आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका यांचे नियंत्रणाखाली इंटिग्रेटेड हेल्थ अॅन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन अंतर्गत **राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)** खालील कंत्राटी रिक्त पदे भरावयाची आहेत.

**अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी - गुणांकन पद्धतीनुसार पदभरती**

| अ.क्र | पदाचे नाव | एकत्रित मानधन | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | संवर्ग | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | Pediatrician - बालरोगतज्ञ | प्रती महा र.रु.३५,०००/- प्रती महा | MD Pead /DNB/DCH | शासकीय अधिकारी असल्यास ७० वर्ष पर्यंत (वय वर्ष ६० नंतरच्या उमेदवारांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र | सदर पदास आरक्षण लागू नाही | ११ |
| २. | Obstetrician & Gynecologist - प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ञ | प्रती महा र.रु.३२,०००/- प्रती महा | MD/MS Gyn / DNB/DGO | | | १२ |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी दिनांक १७/०९/२०२५ ते २८/०९/२०२५ पर्यंत इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन नविन इमारत (कोव्हीड वॉर रूम), ४ था मजला, पुणे महानगरपालिका, पुणे ४११००५ येथे कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टी वगळता) ऑफ लाईन पद्धतीने अर्ज सादर करावा. अर्जा सोबत जन्म तारखेकरीता (वयाचा दाखला/दहावीची टीसी, जन्म प्रमाणपत्र), फोटो आयडी, रहिवाशी दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र (शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेची MMC नोंदणी प्रमाणपत्र, नोंदणी नुतनीकरण प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. शासकीय, निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. सद्याचा पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. २)उमेदवारांकडून सदर अर्ज अर्धवट, अपूर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केला असल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहिल. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्वीकारली जाणार नाही. ३) पदभरतीचे अर्ज ऑफलाईन पध्दतीनेच घेण्यात येत असून सदर उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवुन राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयामध्ये अर्ज स्वीकारले जातील याची नोंद घ्यावी. ४)महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्या संदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे. ५) सदरची माहिती चुकल्यास त्यास आरोग्य विभाग पुणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. ६) तदनंतर अर्जाची छाननी करुन उमेदवारांची पात्र/अपात्र यादी इत्यादीबाबत सविस्तर माहिती वेळोवेळी पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर **https://www.pmc.gov.in** प्रसिध्द करण्यात येईल. ७) सदरील पदे NUHM समिती अंतर्गत राहतील, त्याचा पुणे महानगरपालिका आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. ८) एकूण पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो. ९) सदरील पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ दिनांक २९/०६/२०२५ या कालावधी पुरते भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार १ दिवसाचा सेवाखंड देऊन पुढील नियुक्ती (११ महिने २९ दिवस) कालावधी करीता निर्णय घेण्यात येईल. १०) एकूण १०० गुणांची टक्केवारी राहिल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६० X ५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. | २० गुण |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | (उदा १ वैद्यकीय अधिकारी पदाची आवश्यकता शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त MD/MS Diploma हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास MD/MS Diploma अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion = ६० X २०/१००=१२) | |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकुण १०० गुण |

११)उमेदवारांनी कूठल्याही प्रकारचा खाजगी व राजकीय दबाव आणल्यास त्यांना नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल. १२) निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. १३) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल. १४) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रम पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. १५) उपरोक्त पदांकरिता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. १६) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही. १७) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. १८) सदर अंतिम यादी ही तयार झालेनंतर पुढील १ वर्षासाठी वैध राहील.

(पृथ्वीराज. बी.पी)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
तथा अध्यक्ष,एक्झिक्युटीव्ह कमिटी
आय.एच.एफ.डब्ल्यू.सोसायटी फॉर पीएमसी
पुणे महानगरपालिका



Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

कंत्राटी पदभरती जाहिरात
राष्ट्रीय आरोग्य अभियान
आरोग्य विभाग पुणे महानगरपालिका

आय.एच.एफ.डब्ल्यू/पी.एम.सी/ दिनांक १६/०७/२०२५

आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका यांचे नियंत्रणाखाली इंटिग्रेटेड हेल्थ अ‍ॅन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन अंतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) मधील १५ व्या वित्त आयोगांतर्गत **पॉलिक्लिनिकमध्ये** खालील कंत्राटी रिक्त पदे भरावयाची आहेत.

**विशेषज्ञ - गुणांकन पद्धतीनुसार पदभरती**

| Index | Specialist Post Name | No. Post | Educational Qualification | Remuneration per Visit | Total Visit in One Year | Incentive as per Visit |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Physician (Medicine) | 4 | MD Medicine / DNB | 5000/- | 50 | To visit once in every week. RS. 2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked of his/her specialty to maximum Rs. 5000/- visit |
| 2 | Obstetrician & Gynecologist | 3 | MD/MS Gyn/DNB/ DGO | 5,000/- | 50 | |
| 3 | Pediatrician | 6 | MD Pead /DNB/DCH | 5,000/- | 50 | |
| 4 | Ophthalmologist | 10 | MD Ophthalmologist /DOMS | 5,000/- | 26 | To visit once in every fortnight Rs 2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked of his / her specialty to maximum Rs. 5,000/- visit |
| 5 | Dermatologist | 5 | MD (skin/VD), DVD, DNB | 5,000/- | 26 | |
| 6 | Psychiatrist | 9 | MD Psychiatry/ DNB/DPM | 5,000/- | 26 | |
| 7 | ENT Specialist | 8 | MS ENT/ DNB/DORL | 5,000/- | 25 | |
| | Total | 45 | | | | |

शर्ती व अटी:-

१) इच्छुक उमेदवारांनी दिनांक १७/०७/२०२५ ते २८/०७/२०२५ पर्यंत इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर सोसायटी फॉर पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन नविन इमारत (कोव्हीड वॉर रूम), ४ था मजला, पुणे महानगरपालिका, पुणे ४११००५ येथे कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टी वगळता) ऑफ लाईन पद्धतीने अर्ज भरावा. २) उपरोक्त तासिका/भेट तत्वावरील किमान र.रु. २०००/- मानधन हे निश्चित असेल त्यापुढील प्रति रुग्ण तपासणीकरिता अतिरिक्त र.रु. १००/- (शंभर) देण्यात येईल सदर मानधनाची रक्कम जास्तीत जास्त र.रु. ५०००/- पर्यंत असेल.३) सदरची पदे NUHM प्रकल्पांतर्गत असल्याने सदर पदासाठी बिंदू नामावली लागू राहणार नाही. ४) सदरची पदे NUHM प्रकल्पांतर्गत असल्याने पुणे महानगरपालिका आस्थापनेशी कोणताही संबंध राहणार नाही. वरील सर्व पदे ही कंत्राटी, तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने, सदर पदाकरिता शासकीय सेवेनुसार असलेले नियम, अटी व शर्ती या बाबतचा हक्क व दावा राहणार नाही. त्याचसोबत यावरील सर्व पदांकरिता शासनाकडील सेवा नियम लागू होत नाही. शासकीय सेवा प्रवेश लागू राहणार नाही. ५) सदरची पदे NUHM प्रकल्पांतर्गत भरण्यात येणाऱ्या सर्व उमेदवारांची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल. ६) एकूण पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो. ७) सदरील पदे निव्वळ कंत्राटी पद्धतीने केवळ दिनांक २९/०६/२०२५ या कालावधीपुरते भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील. ८) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. ९) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा व अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा. १०) Specialist यांनी त्यांना नेमून दिलेल्या दिवशी Polyclinic मध्ये किमान ०४ तास (सोमवार ते शुक्रवार दुपारी ०१: ते ०५ व शनिवार सकाळी ०९: ते ०१) या वेळेत थांबून सेवा देणे बंधनकारक राहील. ११) <u>शैक्षणिक कागदपत्रे</u> :- सर्व पदांकरिता उमेदवारांनी अर्ज सादर करताना त्या पदासाठी आवश्यक असलेली प्रथम विहित नमुन्यातील अर्ज, १० वी गुणपत्रक, १२ वी गुणपत्रक, पदवी/पदविकेचे गुणपत्रक (१ ले वर्ष ते अंतिम वर्ष – सर्व Attempt सह), पदवी/पदविकेचे प्रमाणपत्र (Convocation Certificate), अतिरिक्त शैक्षणिक आर्हतेचे प्रमाणपत्र व त्यांना लागू असल्यास संबंधित वैद्यकीय परीषदेकडील वैध असलेली नोंदणी, मुदत संपलेली असल्यास नूतनीकरण प्रमाणपत्र, वय अधिवास व

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला हि सर्व कागदपत्रे अर्जासोबत छायांकित प्रतीत स्वसाक्षांकित करून जोडावीत. ज्या प्रमाणपत्रामध्ये Grading System नुसार मार्क असतील त्यांनी संबंधित प्रमाणपत्रामागील Grade Card ची छायांकित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी (विशेषत:CGPA/SGPA), अर्जासह जोडलेल्या सर्व कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक टाकण्यात यावेत. अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरिता अर्जाच्या वरील पृष्ठभागाची छायांकित प्रत घेऊन येणे व त्यावर कोणत्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या आहेत ते नमूद करावे. १२) वयोमर्यादा :- शासकीय अधिकारी असल्यास ७० वर्ष पर्यंत (वय वर्ष ६० नंतरच्या उमेदवारांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत स्वसाक्षांकित करून जोडावीत. १३) उपरोक्त पदभरतीबाबत असलेल्या सर्व सूचना (तात्पुरते पात्र/अपात्र, हरकती स्वीकारणे, अंतिम पात्र/अपात्र, निवड झालेल्यांची यादी व इतर बाबी) ह्या पुणे महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ https://www.pmc.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत उमेदवारांस कोणतेही सूचना, दूरध्वनी निरोप, SMS, Email केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवारांना वेळोवेळी संकेतस्थळाला भेट देणे अनिवार्य राहील. १४) मेरीट लिस्ट नुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. त्यांची नियुक्ती ही NUHM च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदेश देण्यात येईल. १५) एकूण १००गुणांची टक्केवारी राहील.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६० X ५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा १ वैद्यकीय अधिकारी पदाची आवश्यकता शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त MD/MS Diploma हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास MD/MS Diploma अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion = ६० X २०/१००=१२) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकुण १०० गुण |

१६) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल. १७) सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भविष्यात एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतीक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर अंतिम यादी हि तयार झाल्यानंतर पुढील १ वर्षासाठी वैध राहील. १८) वर नमूद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार व पदभरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार आयुक्त तथा अध्यक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, पदभरती निवड समिती पुणे यांनी राखून ठेवले आहेत. १९) उमेदवारांकडून अर्धवट, अपूर्ण वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केला असल्यास संबंधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्वीकारली जाणार नाही. अर्ज भरणेकामी काही अडचणी असल्यास कार्यालयास सक्षम भेट देऊन विचारणा करण्यात यावी.

(पृथ्वीराज बी.पी)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
तथा अध्यक्ष,एक्झिक्युटीव्ह कमिटी
आय.एच.एफ.डब्ल्यू.सोसायटी फॉर पीएमसी

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner